# विकसित महाराष्ट्र - २०४७

## मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवार, दिनांक ६ मार्च २०२६ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये.

### भाग—एक

### संक्षिप्त अर्थसंकल्प

(रुपये कोटीत)

| बाब | सन २०२५-२०२६ अर्थसंकल्पीय अंदाज | सन २०२५-२०२६ सुधारित अंदाज | सन २०२६-२०२७ अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| महसुली जमा | ५,६०,९६४ | ६,०१,४८९ | ६,१६,०९९ |
| महसुली खर्च | ६,०६,८५५ | ६,३८,५४४ | ६,५६,६५१ |
| महसुली तूट | ४५,८९२ | ३७,०५५ | ४०,५५२ |
| एकूण खर्च | ७,००,०२० | ७,५५,९२० | ७,६९,४६७ |
| राजकोषीय तूट | १,३६,२३४ | १,५१,५३६ | १,५०,४९१ |

राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरले आहे. तसेच राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे.

### वार्षिक योजना २०२६-२७

(रुपये कोटीत)

| बाब | सन २०२५-२०२६ चा नियतव्यय | सन २०२६-२०२७ चा प्रस्तावित नियतव्यय |
|---|---|---|
| राज्यस्तर सर्वसाधारण | १,९०,२४२ | २,०८,८८६ |
| अनुसूचित जाती घटक कार्यक्रम | २२,५६८ | २३,१५० |
| आदिवासी घटक कार्यक्रम | २१,४९५ | २१,७२३ |
| जिल्हा वार्षिक योजना | २०,१६५ | २१,८६७ |

राज्यस्तरीय सर्वसाधारण नियतव्ययाची विभागनिहाय विगतवारी पुढील तक्त्यात दिली आहे.

# सन २०२६-२७ चा राज्यस्तर सर्वसाधारण विभागनिहाय नियतव्यय

(रुपये कोटीत)

| अ. क्र. | विभाग | सन २०२६-२७ करिता प्रस्तावित नियतव्यय |
|---|---|---|
| १. | महिला व बालविकास | २४२३१.२८ |
| २. | ऊर्जा | २७९६३.३६ |
| ३. | सार्वजनिक बांधकाम व रस्ते(सार्वजनिक उपक्रम वगळून) | २६२१८.१६ |
| ४. | जलसंपदा | १६५६९.२८ |
| ५. | ग्रामविकास | १३६५१.२० |
| ६. | नगरविकास | ११०५४.१६ |
| ७. | कृषि | ९५८३.४० |
| ८. | नियोजन | ९६९७.०७ |
| ९. | इतर मागास बहूजन कल्याण | ४५४२.७२ |
| १०. | मृद व जलसंधारण | ४४१६.८८ |
| ११. | पाणीपुरवठा व स्वच्छता | ४०३०.०० |
| १२. | सार्वजनिक आरोग्य | ५९८०.०८ |
| १३. | गृह (परिवहन) | ३७५४.४० |
| १४. | शालेय शिक्षण | ३०७७.३६ |
| १५. | सामाजिक न्याय | ३८३९.९२ |
| १६. | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये | २६१७.६८ |
| १७. | वने | २६०७.२८ |
| १८. | गृह- पोलीस | २३२६.४८ |
| १९. | नियोजन - रोजगार हमी योजना | २२९३.२० |
| २०. | पर्यटन | २०५१.९२ |
| २१. | उच्च शिक्षण | ६८६.४० |
| २२. | दिव्यांग कल्याण | २२८७.०४ |
| २३. | सार्वजनिक बांधकाम-रस्ते (सार्वजनिक उपक्रम) | १५१५.२८ |
| २४. | तंत्रशिक्षण | १४९५.५२ |
| २५. | सार्वजनिक बांधकाम - इमारती | ३०२१.६८ |
| २६. | सामान्य प्रशासन | १८५१.४८ |
| २७. | गृहनिर्माण | १४००.८८ |

| अ. क्र. | विभाग | सन २०२६-२७ करिता प्रस्तावित नियतव्यय |
|---|---|---|
| २८. | सांस्कृतीक कार्य | १२८३.४४ |
| २९. | माहिती व तंत्रज्ञान | १३९४.६० |
| ३०. | उद्योग | १०६१.८४ |
| ३१. | सहकार | ८८९.२० |
| ३२. | अल्पसंख्यांक विकास | ८४४.४८ |
| ३३. | कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता | ८३९.२८ |
| ३४. | वस्त्रोद्योग | ८०४.९६ |
| ३५. | विधि व न्याय | ७८९.३६ |
| ३६. | फलोत्पादन | ७३६.३२ |
| ३७. | मदत व पुनर्वसन | ६६३.५२ |
| ३८. | माहिती जनसंपर्क | ५६८.८८ |
| ३९. | महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय | ५६८.८८ |
| ४०. | क्रीडा | ५५८.४८ |
| ४१. | अन्न व नागरी पुरवठा | ५४७.०४ |
| ४२. | गृह-बंदरे | ५०३.३६ |
| ४३. | महसूल | १४९२.९६ |
| ४४. | लाभक्षेत्र विकास | ४२७.४४ |
| ४५. | पणन | ३३५.९२ |
| ४६. | पशूसंवर्धन | ३२७.६० |
| ४७. | पर्यावरण व वातावरणीय बदल | २५४.८० |
| ४८. | मत्स्यव्यवसाय | २४९.६० |
| ४९. | वित्त | २१६.३२ |
| ५०. | कामगार | १७७.८४ |
| ५१. | गृह -राज्य उत्पादन शुल्क | १५९.१२ |
| ५२. | खारभूमी | ११७.५२ |
| ५३. | मराठी भाषा | २५०.० |
| ५४. | अन्न व औषध प्रशासन | ५९.२८ |
| ५५. | दुग्ध व्यवसाय | ०.०१ |
| | **एकूण . .** | २,०८,८८६.१६ |

**विकसित महाराष्ट्र - २०४७**

- राज्याची अर्थव्यवस्था सन २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर करणार.
- विकसित महाराष्ट्र- २०४७ ची व्हिजन डाक्युमेंट जाहीर.
- राज्याच्या प्रादेशिक संतुलित विकासाला चालना देण्यासाठी प्रमुख चार स्तंभ.

    १. प्रगतिशील

    २. शाश्वत

    ३. सर्वसमावेशक

    ४. सुशासन

- या चार स्तंभाअंतर्गत १६ उपक्षेत्रे निश्चित.
- इथून पुढे येणाऱ्या सर्व अर्थसंकल्पात विकसित महाराष्ट्राच्या संकल्पाचे प्रतिबिंब दिसणार

**स्तंभ पहिला - प्रगतीशील महाराष्ट्र**

**उपक्षेत्र पहिले - कृषि, संलग्न क्षेत्र आणि ग्रामीण विकास**

- राज्याचा कृषि जीडीपी सन २०४७ पर्यंत ५५ अब्ज डॉलर्सवरुन ५०० अब्ज डॉलर्सवर नेण्याचे उद्दिष्ट
- महाविस्तार- एआय प्लॅटफॉम मूळे ३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना पीकसल्ला
- महाविस्तार मध्ये आदिवासी शेतकऱ्यांसाठी आदिवासी भाषेचा समावेश
- स्मार्टफोन नसणाऱ्या शेतकऱ्यांकरिता ‘वसुधा’ ही व्हॉइस सेवा
- ॲग्रीकल्चर डेटा एक्सचेंज ॲन्ड सॅन्डबॉक्स द्वारे कृषी स्टार्टअप्सना चालना
- शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यात महाराष्ट्र देशातील अग्रगण्य राज्य
- फेब्रुवारी, २०२६ पर्यंत १ कोटी ३१ लाख फार्मर आयडी तयार
- आदिवासी वनपट्टेधारक शेतकऱ्यांना देखील फार्मर आयडी मिळणार
- कृषि समृध्दी योजनेअंतर्गत पुढील ४ वर्षाच्या कालावधीत राज्यातील कृषि क्षेत्रात भांडवली गुंतवणूक
- राज्यात पाच लाख हेक्टर क्षेत्रावर नैसर्गीक शेती
- गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेत शेतमजूरांचा समावेश
- राज्याच्या कृषी उत्पन्नात पशुपालनाचा वाटा वाढवण्यासाठी ‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना’
- पशुसंवर्धन आणि मत्स्यव्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा
- संयुक्त राष्ट्र संघटनेने घोषित केलेल्या ‘आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष’ निमित्त महिला गो-पालक, कुक्कुटपालक आणि शेळीपालकांसाठी विशेष प्रोत्साहनपर कार्यक्रम
- मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या विकासासाठी प्रतिवर्षी १ हजार २४० कोटी रुपये आर्थिक भाराची ‘मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना’

- मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा टप्पा-३ ची घोषणा, याअंतर्गत २३ हजार किलोमीटर लांबीच्या रस्ते व पुलांची कामे हाती घेण्यात येणार
- ग्रामीण भागातील शेतपाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते' या नवीन योजनेस मान्यता
- प्रधानमंत्री ग्रामसडक योजना- भाग-४ अंतर्गत लोकवस्तीशी न जोडलेल्या वाड्या- वस्त्या बारमाही रस्त्याने जोडण्याची कामे हाती घेण्यात येणार
- प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण करिता आत्तापर्यंत ३३ हजार ४१० कोटी रुपयांचा खर्च
- पंतप्रधान आवास योजना- शहरी व ग्रामीण अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांवर रुफटॉप सोलार लावण्यासाठी अतिरिक्त अनुदान

**उपक्षेत्र दुसरे - उद्योग**

- राज्यातील उद्योग क्षेत्राचे स्थूल उत्पन्न सन २०४७ पर्यंत १२३ अब्ज डॉलर्सवरुन १५०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढविण्याचे उदिष्ट.
- राज्याचे नवीन उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण - २०२५ जाहीर - २०४७ पर्यंत उद्योग क्षेत्राचा वाटा ३० टक्क्यांपर्यंत नेण्याचे ध्येय निश्चित
- थेट परकीय गुंतवणूकीत महाराष्ट्र देशात अव्वल
- राज्यात प्रत्येक जिल्ह्यात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग केंद्र स्थापन करणार - ५० लाख प्रत्यक्ष रोजगार निर्मिती
- महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण - २०२५ अंतर्गत ५० हजार कोटींपेक्षा जास्त रकमेची गुंतवणूक - ५ लक्ष प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती
- आशियाई विकास बँक अर्थसहाय्यीत सुमारे ४ हजार २७१ कोटी रुपयांचा बांबू विकास प्रकल्प
- लोहखनिजावर आधारित विशाल व अतिविशाल स्टील उद्योगांच्या माध्यमातून गडचिरोली जिल्ह्यात सुमारे २ लक्ष ६२ हजार कोटी रुपये गुंतवणूक व ७० हजार पेक्षा जास्त रोजगार निर्मिती
- महाराष्ट्र रत्ने व आभूषणे धोरण-२०२५ अंतर्गत १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व ५ लाख रोजगार निर्मिती

**उपक्षेत्र तिसरे - सेवा क्षेत्र**

- राज्यात सेवा क्षेत्राचे स्थूल उत्पन्न सन २०४७ पर्यंत ३१२ अब्ज डॉलर्सवरुन ३ हजार अब्ज डॉलर्सवर नेणार
- महाराष्ट्र राज्याला ॲनिमेशन, गेमिंग आणि व्हिज्युअल इफेक्ट्स (AVGC) क्षेत्रात जगात अव्वल बनवण्यासाठी AVGC-XR धोरण-२०२५
- या अंतर्गत मुंबईत 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी' सुरु करण्यात आली

- महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र - 'जीसीसी धोरण - २०२५' धोरणाच्या माध्यमातून राज्यात ४०० नवीन जागतिक क्षमता केंद्र स्थापन करणार- ४ लक्ष उच्च-कुशल नोकरीच्या संधी निर्माण होणार

**उपक्षेत्र चौथे - पर्यटन**

- राज्यात येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत सन २०४७ पर्यंत वार्षिक १६ कोटींवरुन ३८ कोटींपर्यंत वाढ करण्याचे उद्दिष्ट
- महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त निवडक ५० पर्यटन स्थळांचा विकास
- सातारा जिल्ह्यात मुनावळे ते वासोटा किल्ला रोपवे प्रकल्पाची घोषणा
- राज्यातील तिसरी चित्रनगरी नवरगाव, तालुका रामटेक, जिल्हा नागपूर येथे विकसित करणार
- रामटेक येथे रामसृष्टी व कालीदास सृष्टी उभारणार
- महाकवी कालिदास यांच्या जीवनचरित्र चित्रपट निर्मितीसाठी आवश्यक ते सहकार्य
- महानुभाव पंथीयांच्या विविध धार्मिक स्थळांच्या ठिकाणांचा विकास करणार

**स्तंभ दुसरा - शाश्वत**

**उपक्षेत्र पहिले - शाश्वत शहरी विकास**

- २०४७ पर्यंत नागरी लोकसंख्येचे प्रमाण ७० टक्के असणार - स्थूल राज्य उत्पन्नात या घटकाचे ७५ ते ८० टक्के योगदान
- मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था २०३० पर्यंत १४० अब्ज डॉलरवरून ३०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट
- वडाळा येथे जागतिक दर्जाचे स्टार्ट-अप आणि इनोव्हेशन हब स्थापन करण्यासाठी १३० एकर जमिनीचे वाटप
- बुलेट ट्रेन प्रकल्पाचा फायदा घेण्यासाठी विरार, भोईसर आणि ठाणे बुलेट ट्रेन स्थानकाभोवती विकासाकरिता बृहद् आराखडा
- अटल बिहारी वाजपेयी शिवडी - न्हावा शेवा अटल सेतू परिसरात तिसरी मुंबई (मुंबई ३.०) विकसित होणार
- वाढवण, जिल्हा पालघर जवळ चौथी मुंबई विकसित करण्याचे नियोजित
- मुंबई महानगर प्रदेशातील २० लाख झोपडपट्टी धारकांच्या घराच्या पुनर्विकासासाठी तसेच भाडेतत्त्वावरील घरांसह १० लाख परवडणारी घरे विकसित करण्यासाठी बृहद्‍ आराखडा
- मुंबई महानगरच्या धर्तीवर पुणे, नाशिक, नागपूर व छत्रपती संभाजी नगर ग्रोथ हब
- मुंबई महानगर प्रदेशात जीआयएस आधारित मॅपिंगचा वापर करुन 'नो न्यू स्लम फ्रेमवर्क' विकसित करणार
- 'नवीन नागपूर' म्हणून व्यापार व वित्तीय केंद्र विकसित करण्यात येणार

**उपक्षेत्र दुसरे - वाहतूक व मालपुरवठा व्यवस्थापन**

- २०४७ पर्यंत प्रवासी व मालवाहतूकिकरिता १ हजार २०० किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्ग, ६ हजार किलोमीटर पेक्षा जास्त द्रुतगती मार्ग विकसित करण्याचे नियोजन
- २०२९ पर्यंत नवीन १६५ किलोमीटरचे मेट्रो मार्ग उभारणार
- मुंबई विमानतळ आणि नवी मुंबई विमानतळ यांना जोडणारा मुंबई मेट्रो मार्ग-८ हा २२ हजार ८६२ कोटी रुपये किंमतीचा प्रकल्प हाती घेण्यात येणार.
- २३ हजार ४८७ कोटी रुपये किंमतीच्या, वडाळा ते गेट वे ऑफ इंडिया, मुंबई मेट्रो मार्गिका-११ या पूर्णतः भूमिगत प्रकल्पाचा विस्तार धारावी पुनर्वसन प्रकल्पातून पुढे वांद्रे उपनगरीय स्थानक व वांद्रे टर्मिनस पर्यंत करण्याचे नियोजन
- रस्त्यांवरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी मुंबई आणि पुणे शहरात भुयारी मार्गाचे जाळे उभारणार
- ठाणे ते बोरीवली या १८ हजार ८३८ कोटी रुपये किंमतीच्या भुयारी मार्गाचे काम जून, २०२८ पर्यंत पूर्ण करणार
- खारघर ते तुर्भे या २ हजार १०० कोटी रुपये किंमतीच्या भुयारी मार्गाचे काम सप्टेंबर, २०२८ पर्यंत पूर्ण करणार
- गायमुख जंक्शन ते फाउंटन हॉटेल जंक्शन दरम्यान सुमारे ६ किलोमीटर लांबीचा भुयारी मार्ग व फाउंटन हॉटेल ते भायंदर दरम्यान सुमारे ९ किलोमीटर लांबीचा उन्नत मार्ग प्रस्तावित
- ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा उन्नत मार्ग बांधण्याच्या प्रकल्पास मान्यता
- साकेत ते आमणे या उन्नत मार्गाच्या कामाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार
- येरवडा ते कात्रज तसेच हिंजेवाडी ते सिंहगड रोड या ५४ किलोमीटर दुहेरी भुयारी मार्गाचा व्यवहार्यता अहवाल
- पनवेल ते कर्जत उपनगरीय रेल्वे प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून तो लवकरच वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन आहे.
- मुंबई नागरी परिवहन प्रकल्प - (३ब) या १४ हजार ९०७ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पांतर्गत बदलापूर - कर्जत, आसनगांव ते कसारा, पनवेल ते वसई या दरम्यान सुमारे ६९ किलोमीटर लांबीचे नवीन उपनगरीय रेल्वे कॉरिडॉर प्रस्तावित
- येरवडा ते कात्रज तसेच हिंजेवाडी ते सिंहगड रोड या ५४ किलोमीटर दुहेरी भुयारी मार्गाचा व्यवहार्यता अहवाल तयार करण्यात येत आहे.
- ‘महाराष्ट्र अमृतकाल रस्ते विकास योजना २०२५-२०४७’ अंतर्गत ६ हजार २७२ किलोमीटरचे द्रुतगती मार्ग, १४ हजार ९१९ किलोमीटरचे राज्य व जिल्हा मार्ग, ४ हजार २४७ किलोमीटरचे पर्यटन पथ
- शक्तिपीठ महामार्गाच्या कोल्हापूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुधारित संरेखनास मान्यता

- कल्याण, जिल्हा ठाणे ते लातूर पर्यंत ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्गासाठी संरेखनाची कार्यवाही सुरु
- आशियाई बँकेच्या सहाय्याने राज्यातील १ हजार पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रिट रस्त्यांनी जोडण्याची घोषणा
- छत्रपती संभाजीनगर विमानतळ ते वाळूज एमआयडीसी दरम्यान उन्नत मार्गाचे काम दोन टप्प्यामध्ये करण्याची घोषणा
- वाढवण बंदर समृद्धी महामार्गाने जोडण्याकरिता तवा ते भरवीर माल वाहतूक कॉरिडॉरच्या कामास मान्यता
- लातूर, बारामती व अमरावती येथील विमानतळाच्या ठिकाणी रात्रीच्या उड्डाणांची सुविधा करणार
- गडचिरोली ग्रीनफिल्ड विमानतळासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरु
- मुंबई महानगर प्रदेशातील वाढत्या वाहतूक कोंडीला पर्यायी, पर्यावरणपूरक व स्वस्त उपाय म्हणून सध्याचे जलमार्गाचे १२५ किलोमीटरचे जाळे ३४० किलोमीटरपर्यंत विस्तारण्यात येणार
- मुंबई मधील रेडीओ क्लब येथील नवीन जेट्टी प्रकल्प डिसेंबर, २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन

**उपक्षेत्र तिसरे - ऊर्जा आणि शाश्वतता**

- सन २०४७ पर्यंत ७५ टक्के स्वच्छ ऊर्जा मिळवण्याचे उद्दिष्ट
- मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत सन २०२६-२७ मध्ये २० हजार कोटी खर्च अपेक्षित
- मागेल त्याला सौर कृषि पंप योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र राज्य हे देशात प्रथम क्रमांकावर
- प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत देशात राज्य दुसऱ्या क्रमांकावर
- स्वच्छ व पर्यावरणपूरक ऊर्जेची गरज विचारात घेता ‘महाराष्ट्र नवीकरणीय ऊर्जा आणि ऊर्जा साठवणूक धोरण २०२५ ते २०३५’ जाहीर
- या धोरणामुळे ३ लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित
- एकूण ५५ उदंचन प्रकल्पांसाठी सामंजस्य करार- ७८ हजार २१५ मेगावॅट वीजनिर्मिती अपेक्षित
- महाराष्ट्रातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी ३०० कोटी वृक्ष लागवडीची मोहीम हाती घेण्यात येणार

**उपक्षेत्र चौथे - पाणी व्यवस्थापन**

- सन २०४७ पर्यंत ग्रामीण व शहरी भागात विहीत मानकानुसार पाणी उपलब्ध करणार
- राज्य जल माहिती केंद्र स्थापन करण्यात येणार
- वैनगंगा - नळगंगा नदीजोड योजनेच्या ९४ हजार ९६८ कोटी रुपये किंमतीच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली

- बारामती व पुरंदर तालुक्यातील अवर्षण प्रवण भागातील क्षेत्रास पिण्यासाठी व सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता निरा - कऱ्हा नदीजोड प्रकल्प राबविण्याची घोषणा
- राज्यातील शहरांमध्ये जागतिक बँकेच्या सहाय्याने सुमारे ५ हजार ८६० कोटी रुपये किंमतीचा 'महाराष्ट्र नागरी जलपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर प्रकल्प' राबविण्यात येणार
- 'महाराष्ट्र राज्य प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम' अंतर्गत कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी भिमा खोऱ्यातील पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागासाठी वळविण्यात येणार
- संभाव्य एल निनोचा प्रभाव विचारात घेऊन विविध उपाययोजना

**स्तंभ तिसरा - सर्वसमावेशक**

**उपक्षेत्र पहिले - समाजकल्याण**

- राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठीकरिता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर
- या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर, २०२५ रोजी पीक कर्ज थकीत असणाऱ्या राज्यातील पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार
- माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यासाठी समिती
- कातकरी, कोलाम, माडीया या आदिम जमातींच्या तसेच पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पॅकेजद्वारे निधी राखीव ठेवण्यात येणार
- तृतीय पंथीयांना स्वयंरोजगार व व्यवसायासाठी बीज भांडवल उपलब्ध करुन देण्यास मान्यता
- सारथी, बार्टी, आर्टी, टीआरटीआय, महाज्योती, वनार्टी, अमृत आणि मार्टी या संस्थांसाठी पुरेशी तरतूद
- दिव्यांगाकरिता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत १ टक्का निधी राखून ठेवण्यात येणार
- आकांक्षित जिल्ह्यांची संख्या ४ वरुन १० व आकांक्षित तालुक्यांची संख्या १७७
- सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांच्या सर्वंकष विकासासाठी पुढील तीन वर्षांकरिता 'सिंधुरत्न समृद्ध योजना २.०' प्रस्तावित
- कोकण विभागातील साकव बांधणी व दुरुस्तीसाठी विशेष कार्यक्रम हाती घेण्यात येणार
- राज्यात एकल महिलांच्या कल्याणासाठी सुयोग्य धोरण
- 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेसाठी भरीव तरतूद
- सन २०२६-२७ मध्ये २५ लाख लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट
- १३ जिल्ह्यांमध्ये उमेद मॉल उभारण्यास मान्यता

**उपक्षेत्र दुसरे - शिक्षण आणि कौशल्य विकास**

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरात भारतातील पहिली आंतरराष्ट्रीय दर्जाची एज्युसिटी
- ६ आंतरराष्टीय विद्यापिठांशी सामंजस्य करार- अभ्यासक्रम यावर्षी सुरु होणार
- मुख्यमंत्री विज्ञान वारी उपक्रमा अंतर्गत राज्यातील विद्यार्थ्यांना 'इस्रो' (ISRO) आणि अमेरिकेतील 'नासा' या जगप्रसिद्ध संस्थांना भेट देण्याची संधी
- तळागाळातील नवउद्योजकांना आर्थिक बळ देण्यासाठी आपण मुख्यमंत्री उद्योजकता महाफंड
- चर्मकला डिझाईन व उत्पादन अद्ययावत केंद्र बांद्रा, मुंबई स्थापन करण्याचे प्रस्तावित
- आदिवासी जमातीतील युवांना नाविन्यतेवर आधारित उद्योजक आणि उद्योग निर्माते बनविण्यासाठी राज्यात 'भारत इनोव्हेशन, रिसर्च, स्टार्टअप्स फॉर आत्मनिर्भरता-बिरसा' ही योजना राबविण्यास मान्यता.
- महाराष्ट्र देशाचे स्टार्टअप कॅपीटल- युनिकॉर्नच्या संख्येत प्रथम क्रमांक

**उपक्षेत्र तिसरे - आरोग्य**

- सातारा जिल्ह्यात दरे परिसरात निसर्गोपचार केंद्र उभारण्यात येणार.
- मुंबई महानगर या परिसरात वैदिक ज्ञान व संगीत परंपरेवर आधारित वेलनेसचे उत्कृष्टता केंद्र
- कर्करोग, मधुमेह व हृदयविकार यासारख्या आजारांचे लवकर निदान करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या सहाय्यातून ४ हजार ५०० कोटी रुपये किंमतीची 'प्रगती योजना' प्रस्तावित
- राज्यात डिजिटल सार्वजनिक आरोग्य परिसंस्था निर्माण करण्यासाठी 'महाराष्ट्र डिजिटल आरोग्य तंत्रज्ञान अभियान' राबविण्यात येणार.
- सार्वजनिक आरोग्याच्या सर्वंकष उन्नतीसाठी नागपूर येथे भारतीय सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या सहकार्याने 'महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था' स्थापन करण्यात येणार.
- स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई या संस्थेच्या इमारतीच्या एकत्रिकरणाकरिता बृहद् आराखडा तयार करण्यात येणार.
- बीड येथील जिल्हा रुग्णालयाचे विस्तारीकरण करण्यात येणार

**उपक्षेत्र चौथे - सॉफ्ट पॉवर**

- नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे सन २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे सुयोग्य आयोजनासाठी एकात्मिक विकास आराखडा तयार
- त्याअंतर्गत गोदावरी नदी स्वच्छता, शाहीस्नान तसेच पिण्याच्या पाण्याकरिता उपसा सिंचनाद्वारे पाण्याची व्यवस्था, मलनि:स्सारण प्रकल्प, घाट सुधारणाची कामे
- तसेच नाशिक विमानतळ, रिंग रोड, रेल्वे स्टेशन व बस स्टेशन इत्यादी पायाभूत सुविधांची श्रेणीवर्धनाची कामे पूर्ण करण्यात येणार.

- सातारा येथील अजिंक्यतारा किल्ल्याचे तसेच संगम माहुली, सातारा येथील महाराणी ताराबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधीस्थळांचे जतन, संवर्धन व जीर्णोद्धार करण्यात येणार.
- थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जन्मगावी मौजे कटगूण, तालुका खटाव, जिल्हा सातारा येथे भव्य स्मारक उभारण्याचे प्रस्तावित आहे.
- संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीवर्षानिमीत्त ग्रामीण भागाच्या सर्वसमावेशक विकासासाठी प्रमुख राज्यस्तरीय अभियाने एकत्रित करुन 'संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान' राबविण्यात येईल
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड, जिल्हा रायगड येथील चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त तेथील पायाभूत सोयी सुविधांकरिता विकास आराखडा तयार करणार
- सन २०२६-२७ हे वर्ष 'सामाजिक समता व समरसता वर्ष' म्हणून साजरे करणार
- दिवंगत श्री. अजित दादा पवार यांच्या व्यक्तिमत्वाला साजेसे भव्य स्मारक उभारण्यात येणार तसेच त्यांच्या नावे 'गतिमान नागरी सेवा पुरस्कार' देण्याची घोषणा.
- वन संपदेने समृद्ध चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथील सागवान वारशाचे जतन, संशोधन व जनजागृतीसाठी 'टिंबर म्युझियम व झायलॅरियम' उभारण्याचे प्रस्तावित
- मिशन लक्षवेध अंतर्गत राज्य स्तरावर ८ हाय परफॉर्मन्स सेन्टर्स सुरु करण्यात आली असून आणखी ४ केंद्र सुरु करण्याचे प्रस्तावित
- मराठी भाषेतील साहित्य व ग्रंथ अन्य भाषेत अनुवादित करण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवार अकादमी स्थापन करणार

**स्तंभ चौथा - सुशासन व गतिमानता**

**उपक्षेत्र पहिले - प्रशासन**

- राज्यातील नागरिकांना शासकीय योजना आणि सेवा सहज, सुलभ आणि उत्तरदायी पद्धतीने देण्याकरिता शासकीय प्रक्रिया पुनर्रचना उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे.
- आगामी काळात राज्यात टप्प्याटप्प्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर यंत्रणांमार्फत ७५ हजार पदांची पदभरती करण्यात येणार
- नागरिकांच्या मालमत्तांमधील वाद कमी करणे, मालमत्ता हस्तांतरणामधील गैरव्यवहारांना प्रतिबंध करणे आणि मालमत्तांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र भूमि मालकी हक्कधारी अधिनियम आणण्यात येईल.

**उपक्षेत्र दुसरे - तंत्रज्ञान**

- ओपन एआय व सर्वम एआय या जागतिक व राष्ट्रीय स्तरावरील नामवंत संस्थांसोबत हेतूपत्र तसेच आयआयटी, मुंबई आणि भारतजेन यांच्या समवेत शासनाचे सामंजस्य करार
- माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग स्वतंत्रपणे स्थापन करणार
- नागपूर येथे अत्याधुनिक स्टेट डेटा सेंटर स्थापन करणार

**उपक्षेत्र तिसरे - सुरक्षा**

- मानव-वन्यजीव संघर्ष निवारणासाठी व या समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येणार
- स्मार्ट पोलिसिंग आणि न्यायदानासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी महाराष्ट्र पोलीस दलाकरिता बॉडी वोर्न कॅमेरा उपलब्ध करुन देण्यात येणार.
- राज्यात ‘राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था’ मिहान, नागपूर येथे स्थापन करण्यास मान्यता
- राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या धर्तीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची स्थापना

**उपक्षेत्र चौथे - वित्त**

- अर्थव्यवस्थेला गती देण्यास सार्वजनिक गुंतवणूकीबरोबरच खाजगी गुंतवणूकीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक-खाजगी भागीदारी धोरणास मान्यता
- देशाच्या एकूण वस्तू व सेवाकर संकलनात राज्य देशात प्रथम
- राज्याच्या महसूल वाढीचा दर देशाच्या सरासरीपेक्षा जास्त

* * * * *